पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १०**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ९/६/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १९७**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/५/२०२० ते दि.२५/५/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/५९८ दि. १/६/२०२० चे पत्र.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. १९८**

बांधकाम विभागाने झोन क्र. १ कडील महंमदवाडी, धानोरी येथील मान्य करण्यात आलेल्या बांधकाम प्रस्तावांपैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३४९ दि. १/६/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ६ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

**विषय क्र. १९९**

बांधकाम विभागाने झोन क्र. ७ कडील सदाशिव पेठ स.नं. ७२१/१+७२५/२ फा.प्लॉट १००१ व गणेश पेठ सि.स.नं. १३९, १४०, १४०/१, १४२, १४५, १४६, १५२ येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३५० दि. १/६/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ७ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. २००**

पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडील सेवक श्री.गोपीचंद दत्तु पठारे, हुद्दा – बिगारी, यांच्या निलंबनास दि. २९/२/२०२० रोजी ३ री सहामाही पूर्ण होत असून सदर बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९५ दि. २९/५/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २०१**

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन-३ या मेट्रो मार्गिकेवरील सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकातील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी पूल व मेट्रोचे एकात्मिक काम करणे व तेथील अस्तित्वातील पूल तोडणेचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/९०दि.२८/५/२०२० चे पत्र.

(१) कोविड- १९ प्रतिबंधात्मक लॉकडाऊन कालावधीत वाहतुक पोलिसांच्या सहकार्याने विद्यापीठ चौक व ई स्क्वेअर येथील अस्तित्वातील उड्डाणपूल पुणे प्रदेश विकास प्राधिकरण यांना पाडण्यास परवानगी देणेस.

(२) पूल पाडल्यानंतर तेथील राडारोडा उचलून रस्ता दुरूस्तीचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करणेस.

(३) अस्तित्वातील पूल सेगमेंटल ( Segmental ) स्ट्रक्चर स्वरूपात बांधण्यात आलेला असल्याने , पूल पाडतेवेळी सदर सेगमेंटलचा पुनर्वापराबाबत विचार होणेस.

(४) विद्यापीठ चौक येथील एकात्मिक विकसन आराखडा बाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मा. महापौर, मा. पक्षनेते ,मा. पदाधिकारी , महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांचेशी चर्चा करून अंतिम पर्याय निश्चित करणेस.

(५) या एकात्मिक प्रकल्पाचा लाभ विचारात घेता पुणे महानगरपालिकेने सदर प्रकल्पाचा ५०% खर्च उचलावा अशी शासनाच्या सूचनेनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी विनंती केली आहे. तथापि महानगरपालिकेचा सहभाग मूळ मेट्रो प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेच्या (उदा. मेट्रो पिलर्स, स्टेशन्स,जिना,पार्किंग, सब स्टेशन जाहिराती इ.) स्वरूपात असल्याने सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकातील एकात्मिक विकास आराखडा प्रकल्प खर्चाचा भार महानगरपालिकेस लागू नये अशी भूमिका असून गुणदोषावर सर्वसाधारण सभेने निर्णय घेणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण १४ मधील कलम २१०(१)(अ) अन्वये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे पहिल्या टप्प्यात ९.० मी.पेक्षा कमी रुंदीचे एकूण ३२३ रस्ते ९.० मी.रुंद करणेसाठी जाहिर प्रकटनाद्वारे नागरिकांकडून हरकती व सूचना मागविणेस कलम २१०(१)(ब) नुसार मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/९१ दि.२८/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०३**

कोवीड विषाणू प्रार्दुभाव प्रतिबंधाकरीता पुणे म.न.पा.ने खाजगी रुग्णालयांसोबत केलेल्या करारनाम्यांची माहिती अवलोकनार्थ सादर करणेस आणि खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९४ दि.२९/५/२०२० चे पत्र.

१) करार करण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांची देयके पुणे मनपाचे मान्य दराने प्रतिपुर्ती करणेस

२) सदर देयकांचे प्रतिपूर्तीकरीता आवश्यक निधी उपलब्ध करणेस

३) जे रुग्ण महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी ठरत नाहीत अशा रुग्णांची औषधोपचाराची देयके सी.जी.एच. चे दराने प्रतिपूर्ती करणेस

४) उत्पन्नाचे निकष न ठेवता पुणे शहरातील सर्व आर्थिक स्तरातील कोवीड बाधित, संशयीत व सारी रुग्णांची औषधोपचाराची देयके पुणे मनपामार्फत अदा करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे**

ही विनंती.